# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १७४–२०१०/ दिनांक :

श्री. दत्तात्रय दाजी शिंदे,
मु.पो. बागलवाडी, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. दत्तात्रय दाजी शिंदे, मु.पो. बागलवाडी, ता. जत, जि. सांगली यांनी अनुसूची अ मध्ये दि.१२.८.२०१० ला मंचाकडे वितरण कंपनीविरुध्द तक्रार दाखल केली त्याचा तपशील खालील प्रमाणे

तक्रारदार यांनी नवीन ५ एच.पी. शेतीपंपास वीज पुरवठा मिळावा यासाठी वि.प.कडे दि. २४.६.२०१० रोजी अर्ज केला व त्यासाठी लागणारी फी रु. ५०/– पोष्टाने पाठविली. तक्रारदाराचे म्हणणे की, वितरण कंपनीने वितरण वाहिनीचा विस्तार असलेने एक महिन्यात त्यांना चलन देणे गरजेचे होते, तथापी हे चलन तक्रारदारांस दि. ६.८.२०१० रोजी दिलेने कृती मानकाचा भंग झालेला आहे व झालेल्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे ग्राहक भरपाई द्यावी.

यापूर्वी त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र. २१६ दि. २४.६.२०१० रोजी दाखल केली त्याचा आदेश क्र. ७४२० दि. २९.६.२०१० नुसार आदेश होवून भरपाई देणेचे आदेश झाले. त्या आदेशामध्ये वि.प.स कृती मानके साध्य करण्यात अपयश आल्यास ग्राहकास द्यावयाच्या भरपाई बाबत निर्देशित केले आहे. त्या आदेशा विरुध्द प्रस्तुतची तक्रार दाखल केली आहे. त्यामध्ये सांगली कक्षाने दिलेल्या आदेशानुसार चलन देणेस झालेल्या विलंबासाठी रु. १००/– प्रति आठवडा या प्रमाणे भरपाई मंजूर व्हावी अशी मागणी केली आहे. तक्रार प्रतिनिधी मार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने लेखी अहवालात तक्रारदाराचा शेतीपंप कनेक्शन मागणी अर्ज दि. २४.६.२०१० रोजी प्राप्त झाला व त्यांना दि. ६.८.२०१० रोजी चलन देण्यात आले असे म्हटले आहे. त्यांचे ०.०६ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी दि. १८.९.२०१० रोजी सांगली येथे घेण्यात आली. सुनावणीस तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे श्री. राजमाने, कनिष्ठ अभियंता, जत उप विभाग उपस्थित. श्री. राजमाने यांनी २ आठवड्यांचा विलंब झाला असल्याचे मान्य केले. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे २ आठवड्यांच्या विलंबापोटी रु. २००/– भरपाई देणेस वि.प. जबाबदार आहे, कारण कृती मानकाचे पालन करण्यात वि.प.स अपयश आले आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदार यांस वितरण कंपनीने चलन देणेस झालेल्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. २००/– भरपाई द्यावी. सदर रकमेचे समायोजन बिलातून करण्यात यावे.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष